# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः30.10.2024** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या,**

१.पंतप्रधानांच्या हस्ते गुजरातमध्ये विविध पायाभूत आणि विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी,

२.महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या 288 जागांसाठी 10905 अर्ज दाखल, आज होणार छाननी,

३.चीननिर्मित इलेक्ट्रीक वाहनांवरचा कर येत्या पाच वर्षांसाठी 45 टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा युरोपिय राष्ट्रसंघाचा निर्णय,

आणि

४.28 लाख दिव्यांच्या दीपोत्सवात आज अयोध्यानगरी उजळणार.

**मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात त्यांच्या हस्ते एकता नगर भागातील 280 कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या विविध पायाभूत आणि विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी होणार आहे. या भागामध्ये पर्यटकांचा ओघ वाढविणे, त्यांच्यासाठी सुविधांची सहजपणे उपलब्धता करून देणं आणि या क्षेत्रातील शाश्वत विकासाला चालना देणाऱ्या उपक्रमांना बळ देणं हा या प्रकल्पाचा उद्देश्य आहे. त्यानंतर पंतप्रधान आरंभ 6.0 इथं 99 व्या कॉमन फाऊंडेशन कोर्सच्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांनाही मोदी मार्गदर्शन करतील. 'आत्मनिर्भर आणि विकसित भारताचा आराखडा' अशी यंदाच्या कार्यक्रमाची संकल्पना आहे. 99 व्या कॉमन फाऊंडेशन कोर्स - आरंभ 6.0 - मध्ये भारताच्या 16 नागरी सेवा आणि भूतानच्या तीन नागरी सेवांमधील 653 प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

**गोयल दौरा**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल या आठवड्यात सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर आहेत. त्यांचा हा दौरा भारत आणि सौदी अरेबिया यांच्यातील दृढ भागीदारीच्या दिशेने टाकलेलं आणखी एक पाऊल असून त्यामुळे या दौऱ्याला विशेष महत्त्व आहे. पीयूष गोयल काल रियाध इथं पोहोचले.

रियाध इथं ते जागतिक नेते, गुंतवणूकदार आणि नवप्रवर्तकांना आमंत्रित करणाऱ्या फ्यूचर इन्व्हेस्टमेंट इनिशिएटिव्ह अर्थात 'एफआयआय'च्या आठव्या परिषदेमध्ये भाग घेतील. त्यामध्ये उद्योग जगतातील मान्यवरांशी त्यांची चर्चा होणार असून त्यानंतर गोयल यांची सौदीचे उद्योग आणि खनिज संपत्तिमंत्री खालिद अल-फालिह यांच्याशी उद्योग मंत्रालयात द्विपक्षीय बैठक होणार आहे. या बैठकीमुळे दोन्ही देशांच्या आर्थिक धोरणांमध्ये वाढते महत्त्व असलेल्या उत्पादन क्षेत्रातील प्रकल्प विषय आणि प्राधान्यक्रमांना बळकटी मिळेल, अशी अपेक्षा आहे.

**निवडणूक**

महाराष्ट्रामध्ये येत्या 20 तारखेला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याचा काल शेवटचा दिवस होता. कालच्या अखेरच्या दिवशी राज्यातील विविध मतदारसंघांमध्ये अनेक दिग्गज उमेदवारांनी आपापले अर्ज दाखल केले. शक्तिप्रदर्शन करत आणि मिरवणुका काढत हे अर्ज दाखल करण्यात आल्यानं बहुतांश ठिकाणी उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांची गर्दी उसळल्याचं दृश्य पाहायला मिळालं. राज्यातल्या विधानसभेच्या 288 मतदारसंघाच्या निवडणुकीकरता 7 हजार 995 उमेदवारांचे 10905 अर्ज दाखल झाले आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. आज या सर्व अर्जांची छाननी होणार असून, चार नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत.

झारखंडमध्ये दुसऱ्या टप्प्यासाठी 1 नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. राज्यात विधानसभा निवडणुका दोन टप्प्यात होत आहेत. पहिल्या टप्प्यात काल अर्जांची छाननी झाल्यानंतर 743 उमेदवार रिंगणात आहेत. पहिल्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. 13 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे.

**आयुर्वेद**

"देशातील नागरिक निरोगी असतील तर देशाच्या प्रगतीला गती मिळत असल्यानं आरोग्यविषयक पायाभूत सुविधा वाढविणं हे सरकारचं प्राधान्य आहे," असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. धन्वंतरी जयंती आणि नवव्या आयुर्वेद दिनानिमित्त नवी दिल्ली इथं काल सुमारे 12850 कोटी रुपयांच्या आरोग्य क्षेत्राशी संबंधित अनेक प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. मोदी यांनी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचा काल शुभारंभ केला. या योजनेदवारे 70 वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या सर्व ज्येष्ठ नागरिकांना आरोग्यसुविधा वाजवी दरात उपलब्ध होणार आहेत. यामुळे कोणत्याही उत्पन्न गटातील सर्व ज्येष्ठ नागरिकांना सहजपणे आरोग्य सेवा मिळण्यास मदत होणार आहे. देशातील पहिल्या अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेच्या दुसऱ्या टप्प्याचं उद्घाटनही मोदी यांच्या हस्ते झालं. यामध्ये पंचकर्म रुग्णालय, औषध निर्मितीसाठी आयुर्वेदिक फार्मसी, स्पोर्ट्स मेडिसिन

युनिट, सेंट्रल लायब्ररी, आयटी आणि स्टार्ट अप इन्क्युबेशन सेंटर आणि 500 आसनांचे प्रेक्षागृह आदींचा समावेश आहे.

**चीन व्यापार युरोप**

युरोपिय राष्ट्रसंघानं चीननिर्मित इलेक्ट्रीक वाहनांवरचा कर येत्या पाच वर्षांसाठी 45 टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. ब्रसेल्स आणि बिजींग दरम्यान झालेल्या वाटाघाटीत हा कर काढून टाकणे किंवा कमी करण्याबाबत चर्चा झाली. युरोपनं  तीन प्रमुख चीनी इलेक्ट्रीक वाहनांचे ब्रँड एसएआय़सी, बीवायडी आणि गिली यांच्यावर वैयक्तिक कर लागू केला आहे.
या वाहनांच्या व्यापार धोरणांविषयी देखरेख करणाऱ्या कमिशनच्या मते, या अर्थसहाय्य, अनुदान तसंच जमीन, बॅटरी आणि कच्चा माल यासह बाजारपेठेतल्या किंमतीपेक्षा कमी अनुदान देण्याच्या अनुचित प्रकाराला आळा बसणं गरजेचं असल्यामुळे ही पावले उचलण्यात आली आहेत.

**नियुक्तिपत्र**

पंतप्रधानांच्या हस्ते काल  विविध सरकारी विभाग आणि संघटनांमध्ये नवनियुक्त युवकांना 51 हजारांहून अधिक नियुक्तीपत्रांचं वाटप दूरस्थ पद्धतीनं करण्यात आलं. सरकारनं  आत्मनिर्भर भारतासाठी महत्त्वपूर्ण काम केलं असून अंतराळ क्षेत्रापासून इलेक्ट्रिक वाहनांपर्यंत नवीन तंत्रज्ञानासह प्रत्येक क्षेत्रात मेक इन इंडिया योजनेला प्रोत्साहन दिलं आहे. देश आता जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. देशातील तरुणांना रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे, असं  मोदी यावेळी म्हणाले.

**एकता दौड**

देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी 31 ऑक्टोबरला आयोजित केली जाणारी एकता दौड यावर्षी दिवाळीमुळे दोन दिवस आधीच म्हणजे काल घेण्यात आली. नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या एकता दौडला हिरवा झेंडा दाखवला. केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीय यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. एकता दौड ही देशाच्या एकतेसाठीच नाही, तर विकसित भारताचा संकल्प देखील असल्याचं शहा यावेळी म्हणाले.

**अयोध्या दीपोत्सव**

अयोध्येच्या  प्रभू श्रीराम मंदिरात आज भव्य दीपोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. शरयू नदीच्या घाटावर होणाऱ्या दीपोत्सवात, पणत्या उजळण्याचे सर्व विक्रम मोडले जाणार आहेत.  नवा विश्वविक्रम प्रस्थापित करण्यासाठी 28 लाख दिवे उजळले जाणार आहेत. मुख्य कार्यक्रमासाठी संपूर्ण

शहराची स्वच्छता आणि सजावट करण्यात आली आहे. अवध विद्यापीठाच्या स्वयंसेवकांनी 16 बाय 16 च्या चौकोनांमध्ये 256 दिव्यांची सजावट केली आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड पथकाचे सल्लागार आणि विद्यापीठाच्या मोजणी समिती सदस्यांच्या नेतृत्वाखाली 30 लोकांच्या चमूने 55 घाटांवर सजवलेल्या दिव्यांची मोजणी केली आहे. आज रामपथावर निघणाऱ्या शोभा यात्रेची तालीमही करण्यात आली. 1,100 हून अधिक पुजाऱ्यांकरवी शरयू नदीची आरतीही करण्यात येणार आहे. याबाबत पंतप्रधान मोदी यांनी काल एका कार्यक्रमात यंदाची दिवाळी ऐतिहासिक असेल कारण अयोध्येत श्रीराममंदीर हजारो दिव्यांनी उजळून निघेल. हा उत्सव अभूतपूर्व असेल, असं प्रतिपादन केलं आहे. नागरिकांनीही हा सण उत्साहानं साजरा करत आपल्या घरी दीपोत्सव करावा असं आवाहन उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केलं आहे.

**गडकरी**

भारत आणि स्पेन यांच्यात विविध क्षेत्रांमध्ये दीर्घकालीन आणि सशक्त भागीदारी आहे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. मुंबई इथं काल भारत-स्पेन अधिकाऱ्यांच्या मंचाला ते संबोधित करत होते. यावेळी भारत दौऱ्यावर असलेले स्पेनचे राष्ट्राध्यक्ष एच ई पेड्रो सँचेज उपस्थित होते.

**भारत चीन**

भारत-चीन प्रत्यक्ष नियंत्रण रेषा कराराशी संबंधित घडामोडींवर अमेरिकेचं बारकाईनं लक्ष असून सीमेवरील तणाव कमी होण्याच्या कोणत्याही घटनेचं अमेरिका स्वागतच करेल, असं अमेरिकेनं म्हटलं आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते मॅथ्यू मिलर यांनी काल प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ही माहिती दिली. जून 2020 मध्ये गलवान खोऱ्यात दोन्ही देशांच्या सैनिकांमध्ये झालेल्या झटापटीत दोन्ही बाजूंचे बळी गेल्यानंतर प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर भारत आणि चीन यांच्यात तणावपूर्ण लष्करी संघर्ष सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या उपस्थितीत नुकत्याच रशियाच्या कझान येथे झालेल्या 16 व्या ब्रिक्स परिषदेपूर्वी एलएसी गस्त कराराची घोषणा करण्यात आली.

**क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतानं सहा खेळाडू राखून विजय मिळवत तीन सामन्यांची मालिका दोन - एकनं जिंकली आहे. काल अहमदाबाद इथं झालेल्या सामन्यात न्यूझीलंडच्या संघाने प्रथम फलंदाजी करत 232 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल भारतीय महिलांनी स्मृती मंधानाच्या शतकी खेळीच्या बळावर 45 व्या षटकात चार खेळाडू गमावत हे लक्ष्य साध्य केलं. स्मृती मंधानाला सामनावीर, तर दीप्ती शर्माला मालिकावीर पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. **या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**